| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**<br>**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,**<br>डॉ. नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१ | |

| | | |
|---|---|---|
| उपसंचालक आरोग्य सेवा<br>(आमाजिआ)<br>तथा उपमुख्य निबंधक<br>(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य | कार्यालय ☎<br><br>फॅक्स क्र.<br>ई-मेल | :०२०-२६०५९५३०<br>:०२०-२६०५८६१०<br>:०२०-२६०५८२९२<br>crs_d83@yahoo.com |


**आरोग्य सेवा** जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८ ३/हजयात्रा/प्रमाणपत्र/250-320 /१६

महत्वाचे परिपत्रक क्रं.१ दिनांकः- 7 जानेवारी २०१६

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म व मृत्यु
जिल्हा परिषद, .............(सर्व)

२) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ साऊथ वार्ड, परेल, मुंबई.

३) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,महानगरपालिका, .............(सर्व)

**विषय**:- हजयात्रेसाठी हज यात्रेकरुंना जन्म-मृत्यु प्रमाणपत्र निर्गमित करणेबाबत...

**संदर्भ**:- ॲड.श्री.सलीम शेख,रा.२४२१,ईस्ट स्ट्रीट,कॅम्प,पुणे यांचे पत्र No.F1/HAJ/16, दि.२८/१२/२०१५.

हज यात्रेकरुंना हजयात्रेस जाण्यासाठी आंतर्राष्ट्रीय पारपत्राची आवश्यकता असते. त्याकरिता राज्यस्तरावरुन सर्व जन्म-मृत्यू निबंधक यांना या कार्यालयाचे पत्र जा.क्रं.आमाजीआ/कक्ष-८ ३/हजयात्रा प्रमाणपत्र/१००४-१०७५/१५, दिनांक ०२/०३/२०१५ नुसार कायम स्वरुपी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरीही ॲड.श्री.सलीम शेख यांचेकडील संदर्भिय पत्रानुसार करण्यात आलेल्या विनंतीनुसार पुनश्चः याबाबत खालील प्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

आंतर्राष्ट्रीय पारपत्र पारित करण्याकरिता सौदी अरब सरकार कडुन संबंधित व्यक्तिचे जन्म प्रमाणपत्र, विधवा/विधूर व्यक्तिस त्याच्या जोडीदाराचे मृत्यु प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक केलेले आहे. राज्यातील हज यात्रेकरुंना हज यात्रेस सहभागी होता यावे, त्यांना हज यात्रेपुर्वी आंतर्राष्ट्रीय पारपत्र प्राप्त करता यावे याकरिता त्या व्यक्तिस जन्म प्रमाणपत्र व विधवा/विधूर व्यक्तिस त्याच्या जोडीदाराचे मृत्यु प्रमाणपत्र त्वरित उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे अपेक्षित आहे. जन्म व मृत्यु प्रमाणपत्र निर्गमित करण्यास निबंधक,जन्म-मृत्यु सक्षम आहे. राज्यातील सर्व निबंधक,जन्म-मृत्यु यांना खालील सूचना देण्यात येत आहे.

१) ज्या हज यात्रेकरुची जन्म नोंदणी झालेली आहे, त्यांना कलम १२/१७ अंतर्गत त्वरित जन्म प्रमाणपत्र त्वरीत देण्यात यावे.

२) ज्या यात्रेकरुंची जन्म नोंदणी झालेली नाही त्यांना कलम १३(३) अंतर्गत त्वरीत अनुपलब्धता दाखला देऊन उशिरा नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत सहकार्य करावे.

आपण आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व निबंधकांना (गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आरोग्य अधिकारी महानगरपालिका/मुख्याधिकारी नगरपालिका/कार्यकारी अधिकारी कटक क्षेत्र/प्रशासक, ॲम्युनिशन फॅक्टरी/ग्रामसेवक, ग्रामपंचायत) खालील सूचना त्वरीत निर्गमित कराव्यात.

ज्या विधवा महिलेला सौदी अरेबिया येथे हजयात्रेस जाण्यासाठी व पारपत्र काढण्यासाठी पतीच्या मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे त्यांनी त्यांच्या मृत पतीच्या मृत्यु दाखल्याची मागणी केल्यास मृत्यु नोंदवहीतील नोंदीच्या आधारे मृत्यु दाखला देण्यात यावा व ज्यांची मृत्यु नोंदणी झालेली नाही अशा संदर्भात कलम १३(३) अंतर्गत त्वरीत अनुपलब्धता दाखला देऊन उशिरा नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत सहकार्य करावे.

हज यात्रे दरम्यान भारतीय नागरीक देशाबाहेर मृत पावले असल्यास त्या व्यक्तींची मृत्यु नोंद, त्या संबंधित देशाच्या भारतीय दूतावासा मध्ये (भारतीय कॉन्सुलेट) करणे गरजेचे आहे. सदरील देशाबाहेर मृत्यु पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांनी (विधवा अथवा विदुर) भारतात परतल्या नंतर पुन्हा मृत्युची नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. सदरील मृत्युबाबत भारतीय दूतावासा मार्फत (भारतीय कॉन्सुलेट) निर्गमित केलेले मृत्यु प्रमाणपत्र केंद्रिय जन्म-मृत्यु अधिनियम १९६९ नुसार वैध आहे.

हज यात्रे दरम्यान मृत्यु पावलेल्या व्यक्तींचे नातेवाईक भारत देशात परत आल्यानंतर निबंधक जन्म-मृत्यु यांचेकडे नोंदणी करण्याकरिता आल्यास, त्यांना संबंधीत देशातील भारतीय दुतावासाने दिलेले मृत्यु प्रमाणपत्र उचित असल्याचे अवगत करावे.

सदर कामास प्राधान्य देण्यास यावे तसेच कायदयातील तरतुदींच्या अधिन राहून या प्रकरणांचा निपटारा तातडीने करण्यात यावा जेणेकरुन संबंधित व्यक्तिस जन्म अथवा मृत्यू प्रमाणपत्र त्वरित उपलब्ध होऊ शकेल.

आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास पाठविण्यात यावा.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहितीस्तव सादर :- मा. संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्रत सस्नेह - उपसंचालक आरोग्य सेवा, परिमंडळ.... (सर्व)
प्रत माहितीसाठी :- ॲड. श्री. सलीम शेख, ऑफिस नं ९५ पहिला मजला इस्ट स्ट्रीट, पुणे
आपण केलेल्या विनंतीनूसार सर्व निबंधक जन्म-मृत्यू (महाराष्ट्र राज्य) यांना कायम स्वरुपी याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.